ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 173

वर्ष ३९ | पुणे, बुधवार, १८ जुलै, १९७३ | अंक १४

## तुमच्या मुलीचे लग्न ही काही बाहुला बाहुलीच्या लग्नाइतकी सोपी गोष्ट नाही...



## पण आमच्या आवर्तक ठेव योजनेमुळे ती सोपी होते...

तुमच्या मुलीच्या लग्नासाठी आवश्यक तेवढा पैसा आमच्या ह्या आवर्तक ठेव योजनेमुळं खात्रीनं उपलब्ध होतो. दर महिन्याला ठराविक रकमेची बचत करा. तुमची बचत सतत वाढतच जाईल आणि ज्या वेळी तो मंगल दिवस उगवेल त्यावेळी तुम्हाला जाणवेल... आपण किती सुखी आहोत... पैशाची तर चिंताच नाही.

दर महिन्याला बँकेत ठेवायची रक्कम रु. ५ किंवा त्याच्या पटीत
मुदत : १ ते १० वर्षे
व्याज : ७ टक्क्यांपर्यंत

अधिक तपशीलासाठी आमच्या कोणत्याही शाखेला भेट द्या.

**बँक ऑफ महाराष्ट्र**
हेड ऑफिस : ११७७ बुधवार पेठ, पुणे २.

**राजधानी एक्सप्रेस**—मुंबई ते दिल्ली जाणाऱ्या ह्या एक्सप्रेसला हा प्रवास पुरा करण्यास सध्या फक्त १९ तास लागतात. वाटेतील इंजिनिआरिंगची काही कामे पुरी झाल्यावर हा प्रवास १४ तासांत पुरा होऊ शकेल. गेल्या वर्षी ह्या आगगाडीने ४१,३८,६२३ रु. उत्पन्न दिले. तिने जाता-येता मिळून २०४ खेपा पुऱ्या केल्या.

**पिकासोच्या पेंटिंगला ४९ लक्ष रु.**—पिकासोने १९०१ साली काढलेले ले मार्ट हे पेंटिंग लंडन येथील लिलावात ४९ लक्ष रुपयांस विकले गेले.

**तांब्याच्या पत्र्यांवर "रामचरितमानस"**—इंदूर येथील भांड्यांवर नावे घालण्याचा धंदा करणाऱ्या गजानन मिश्रा ह्या ३१ वर्षाच्या माणसाने संबंध 'रामचरितमानस' तांब्याच्या पत्र्यावर कोरून लिहिले आहे. त्यात चित्रेही कोरली आहेत. ह्या पत्र्यांची संख्या १९६ असून त्यांचे वजन ९६ किलोग्रॅम आहे. ह्या कामास त्याला साडेपाच महिने लागले.

**संशोधनासाठी उद्योगधंद्यांवर सेस**—संशोधन व विकास ह्या कामासाठी उद्योगधंद्यांवर 'सेस' बसविण्याचा विचार औद्योगिक विकास खाते करीत आहे. तो बसविण्यात आला तर दरसाल ३०० ते ४०० कोटी रुपये जमा होतील असा अंदाज करण्यात आला आहे. ह्या रकमेचा उपयोग उद्योगधंद्यांना संशोधनासाठी मदत करण्यासाठी होईल.

**अवर्षणाचा मधनिर्मितीवर परिणाम**— अवर्षणामुळे महाबळेश्वर येथील मधनिर्मितीत ८०% घट झाली. दरसाल ३,००० किलोग्रॅम मधाची निर्मिती होते; चालू वर्षी ती फक्त ५०० किलोग्रॅम झाली. महाबळेश्वरला गेल्या वर्षी तेथील सरासरीच्या (६२५ सें. मी.) निम्म्यापेक्षाही फार कमी पाऊस पडला.

**वैद्यकीय शिक्षणाचे भवितव्य**—मुंबई येथील म्युनिसिपल वैद्यकीय कॉलेजातील जागांपैकी ३४ टक्के जागा वर्गीकृत जातींतील विद्यार्थ्यांसाठी राखून ठेवण्याचा निर्णय जर अमलात आणण्यात आला तर वैद्यकीय व्यवसायाची झपाट्याने अधोगती होण्याची भीती ख्यातनाम डॉक्टरांनी व्यक्त केली आहे. वर्गीकृत जातींतील विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी इंटर सायन्स परीक्षेत ४० टक्के मार्क पुरेत अशी तरतूद आहे; इतरांना मात्र ६४ टक्के गुण मिळूनही प्रवेशाची खात्री नाही.

**गायकांची बतावणी करून ब्रिटनमध्ये प्रवेश**—मुंबईचे १२ हिंदी लोक गायकांची बतावणी करून, आपण ग्रेट ब्रिटनमध्ये कार्यक्रम करणार आहोत असे सांगून, खोट्या नावाखाली, खोट्या पासपोर्टवर तेथे गेले. बतावणी पुरी करण्यासाठी त्यांनी वाद्येही बरोबर घेतली होती. तेथे पोचल्यावर स्वतःच्या खऱ्या नावावर त्यांनी नोकऱ्या मिळविल्या. त्यांच्यावर लंडन येथे खटला चालू आहे.





प्रथम पासूनच किर्लोस्कर एंजिने त्यांच्या उत्तम दर्जाबद्दल प्रसिद्ध आहेत.
देशातील आणि परदेशातील असंख्य शेतकरी व इतर ग्राहक यांच्याकडे वापरात असलेली एंजिने हे याचे प्रतीक आहे.

आतां भारतीय मानक संस्थेने (ISI) देखील प्रमाणपत्र देऊन, हे मान्य केले आहे.

किर्लोस्कर

किर्लोस्कर एंजिन- शेतकऱ्याची पहिली पसंती

किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लि.
१३, लक्ष्मणराव किर्लोस्कर रोड, खडकी, पुणे ३

® एंजिनसाठी किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लिमिटेड यांनी या ट्रेडमार्कच्या उपयोगाचा अधिकार नोंदविलेला आहे.

Tom & Bay/KO-7315

☆ अर्थ ☆

बुधवार, १८ जुलै, १९७३



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.

## चलनवाढीला उत्तेजन सरकारनेच दिले

### वाढत्या किमतींचे कारण तुटीचा अर्थभरणा

देशातील सतत वाढत जाणाऱ्या किमतींविषयी चार प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञांनी भारत सरकारच्या तुटीचा अर्थभरणा करण्याच्या धोरणाला दोष दिला आहे. त्यात पुणे येथील गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्थेचे डॉ. व्ही. एम. दांडेकर, भारत सरकारचे मुख्य माजी आर्थिक सल्लागार डॉ. अशोक मिश्र ह्यांचा समावेश आहे. सध्या होत असलेल्या किमतीच्या वाढीविषयी मत व्यक्त करताना डॉ. दांडेकर म्हणाले की, गेल्या काही वर्षांत सरकारने अंदाजपत्रकातील तूट उत्तरोत्तर वाढत्या प्रमाणात, नव्या चलनी नोटा छापून केली आहे. त्यामुळेच मुख्यतः किमती वाढत चालल्या आहेत. म्हणून विरुद्ध दिशेची उपाययोजना आता करण्यात आली पाहिजे. बँक रेटमध्ये वाढ करून चलनवाढीला आळा बसणार नाही. गेल्या वर्षात व्यापार-धंद्याला मिळणाऱ्या कर्जात फारशी वाढ झालेली नाही. मध्यवर्ती सरकार व राज्य-सरकारे ह्यांनीच चलनवाढीला सर्वतोपरी उत्तेजन दिलेले आहे. कारण, त्यांचे सर्व उद्योग मूलतः अनुत्पादन स्वरूपाचे होते. त्यांचा बँक रेटशी काहीच संबंध नाही. उलट बँक रेट वाढविल्या-मुळे अर्थव्यवस्थेतील उत्पादक कामावरच विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. अर्थातच चलनवृद्धीची परिस्थिती अधिकच तीव्र होण्याचा संभव नाकारता येणार नाही. सध्या जी चलनवृद्धी झाली आहे तिचे खरे कारण असे आहे की श्रीमंत वर्गांना हात न लावता गरिबी दूर करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. त्याचबरोबर सरकारच्या उधळपट्टीला आणि काही थोड्या लोकांच्या वैभवाला तात्पुरती बंदी न घालता गरिबी दूर करण्याचे प्रयत्न होत आहेत.

समाजवादी घोषणाच फक्त करण्यात येतात; त्यांना समाज-वादी शिस्तीची जोड देण्यात येत नाही; त्याचा हा परिणाम आहे. कोणावर तरी अपयशाचे खापर फोडण्यास आता कोणी शिल्लक राहिलेले नाही. आता कोणतीही सबब सांगता येण्या-सारखी नाही. आपणाला कोण फसवीत आहे ते लोकांना आता कळू लागले आहे. गुजरात राज्याचे नियोजन मंत्री श्री. चिमणभाई पटेल म्हणाले की पैशाच्या पुरवठ्यात कधीही नव्हती इतकी वाढ झाली. परंतु गरजेच्या वस्तूंचे उत्पादन मात्र त्या प्रमाणात झाले नाही. एका वर्षात लोकांजवळील पैशाचा पुरवठा १,२०८ कोटी रुपयांनी वाढला. २८ एप्रिल १९७२ ह्या दिवशी हा पुरवठा ८,२४७ कोटी रुपयांचा होता, तो २८ एप्रिल १९७३ ह्या दिवशी ९,५४५ कोटी रुपयापर्यंत फुगला. तामीळनाडू राज्याचे नियोजनमंत्री डॉ. बांइटसिंग म्हणाले की समाजातील काही वर्गांची खरेदीची शक्ती वाढत गेली आणि रोजखपाच्या वस्तूंचा पुरवठा अपुरा पडला. म्हणून किमती वाढत गेल्या. लोकांच्या उत्पन्नापैकी मोठा भाग अन्नावर खर्च होत असल्याने अन्नपदार्थांचा पुरवठा वाढविला की किमतींची पातळी खाली येईल अशी समजूत प्रचलित आहे. पण गेल्या काही वर्षांत शहरीकरण वाढत चालले आहे. त्यामुळे अन्नाखेरीज इतर उपभोग्य वस्तूंची मागणीही बरीच वाढत चाललेली आहे. अशा इतर वस्तूंचा पुरवठा जर अपुरा झाला तरीही किमतीची वाढ होण्याला उत्तेजन मिळत असते. डॉ. मित्र म्हणाले की ज्या लोकांना किमतीच्या वाढीचा फायदा मिळाला त्यांची सरकारवर जबर पकड आहे. किमती वाढल्यामुळे गरीब व ठराविक उत्पन्न असणाऱ्या लोकांचे नुकसान झाले आहे. उत्पन्नाच्या विषम वाटणीचा हा परिणाम आहे.

---

### वाढती महागाई

| | | जून १९७३ | जानेवारी १९७३ | जानेवारी १९७१ |
|---|---|---|---|---|
| मटण | किलो | ११·०० | ६·५० | ६·०० |
| बटाटे | ,, | १·७५ | १·०० | १·०० |
| कांदे | ,, | १·०० | ०·६० | ०·५० |
| अंडी | १ डझन | ६·०० | ४·२० | ३·१० |
| साखर | किलो | ४·९० | ३·५० | २·०० |
| डालडा | ,, | ११·०० | ७·०५ | ६·०० |
| पोस्टमन तेल | ,, | १०·१० | ५·८० | ४·५० |
| तूर डाळ | ,, | ३·०० | २·६० | २·०० |
| मूग डाळ | ,, | ३·७० | ३·४० | २·०० |
| हरबरा डाळ | ,, | २·९० | २·१० | १·७० |
| उडदाची डाळ | ,, | ३·१५ | ३·४० | १·८० |
| गूळ | ,, | ४·०० | २·६० | १·६० |
| खोबरेल | ,, | ११·०० | ६·६० | ६·०० |
| तीळ तेल | ,, | ११·०० | ७·७० | ५·८० |

## बँकांतील ओव्हरटाईम भत्यात प्रचंड वाढ
## ह्या भत्याच्या खर्चात २,००० नवे कर्मचारी नेमता येतील !

राष्ट्रीयीकृत बँकांनी १९६७ ते १९७२ अखेर दिलेल्या ओव्हरटाईम भत्यांचे आकडे लोकसभेत सादर केले, ते उद्बोधक आहेत. १९६७ मध्ये राष्ट्रीयीकृत बँकांनी ३१३.३ लक्ष रु. ओव्हरटाईम भत्ता दिला; १९७२ मध्ये ही रक्कम ६१७ लक्ष रु. वर गेली ! ह्या बाबतीत सेंट्रल बँक आणि बँक ऑफ बरोडा ह्या बँका आघाडीवर आहेत. (१९७२ साली अनुक्रमे ९४.५० लक्ष रु. आणि ८९ लक्ष रु.) १९६७ ते १९७२ ह्या काळातील ओव्हरटाईम भत्ता सर्वच बँकांच्या बाबतीत वाढला आहे. एकूण खर्चाशी ओव्हरटाईम भत्याचे प्रमाण अलाहाबाद बँक आणि बँक ऑफ बरोडा ह्यांच्या बाबतीत सर्वात अधिक आहे.

कर्मचाऱ्यांवरील खर्चाशी ओव्हरटाईम भत्याचे सरासरी प्रमाण ५.४% पडले. सिंडिकेट बँकेचे प्रमाण सर्वात कमी म्हणजे १.२% आहे. कॅनरा बँक ३.५%, सेंट्रल बँक ३.५%, देना बँक आणि इंडियन बँक ५.३%, बँक ऑफ महाराष्ट्र ५.४%, इंडियन ओव्हरसीज आणि युनायटेड बँक ५.६%, युनियन बँक आणि बँक ऑफ इंडिया ५.७%, युनायटेड कमर्शिअल बँक आणि पंजाब नॅशनल बँक ५.९%, अशी इतर बँकांतील प्रमाणे आहेत.

१९७२ मध्ये एकूण ६१७ लक्ष रु. ओव्हरटाईम भत्ता दिला. तेवढ्याच खर्चात २,००० नवे कर्मचारी नेमता येतील आणि त्या प्रमाणात बेकारी निवारणास मदत होईल, असा हिशेब करण्यात आला आहे.

बँकांतील कर्मचाऱ्यांना इतर क्षेत्रांतील कर्मचाऱ्यांपेक्षा किती जास्त पगार मिळतो आणि तो कितीतरी जास्त प्रमाणात वाढत जातो, हे खालील एका तक्त्यात दाखविलेले आहे. उदाहरणार्थ, बँकेतील कर्मचाऱ्याचा (कारकुनाचा) पगार ५५० रु. पर्यंत वाढू शकतो, तर मध्यवर्ती सरकारच्या नोकरीतील त्याचा भाऊबंद १८० रु. च्या वर जाऊ शकत नाही. रिझर्व्ह बँकेतला कर्मचारी ५९० रु. पर्यंत पोचतो. बँकेतील पट्टेवाला २०० रु. पर्यंत जातो, तर मध्यवर्ती सरकारच्या नोकरीतील त्याचा भाऊबंद ८५ रु. च्या वर जाऊ शकत नाही. (हे सर्व बेसिक पगाराचे आकडे आहेत).

---

### तुलनात्मक बेसिक पगार

| संस्था | किमान बेसिक कारकून रु. | किमान बेसिक पट्टेवाला रु. | कमाल बेसिक कारकून रु. | कमाल बेसिक पट्टेवाला रु. |
|---|---|---|---|---|
| मध्यवर्ती सरकार | ११० | ७० | १८० | ८५ |
| राष्ट्रीयीकृत 'अ' वर्ग बँका | १७० | ११६ | ५५० | २०० |
| रिझर्व्ह बँक | २१० | १३५ | ५९० | २३५ |
| इंजिनिअरिंग कंपनी | १९३ | १५० | ३०५ | १७९ |
| ऑइल मिल | ९५ | ५० | ३७१ | १३१ |
| विद्युत् उपकरणे | ९८ | ४७ | ३१३ | ११९ |
| पेट्रोलिअम | १४५ | ८५ | ३७५ | १२५ |
| औषधी | १२५ | ५५ | ३६५ | १३३ |

### राष्ट्रीयीकृत बँकांनी दिलेला ओव्हरटाईम भत्ता (लक्ष रुपये)

| बँकेचे नाव | | १९६७ | १९६८ | १९६९ | १९७० | १९७१ | १९७२ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. सेंट्रल बँक ऑफ इंडिया | ... | ५७.२७ | ६९.५५ | ५८.७९ | ६६.१० | ७९.६६ | ९४.५० |
| २. बँक ऑफ इंडिया | ... | ३४.१५ | ३९.५७ | ४७.३९ | ५७.८४ | ७२.६९ | ८३.८२ |
| ३. पंजाब नॅशनल बँक | ... | ५६.०० | ५५.०५ | ५७.५४ | ६७.६२ | ८६.७० | ४५.२७+ |
| ४. बँक ऑफ बरोडा | ... | ३१.२७ | ३७.६२ | ५३.६० | ६५.४६ | ८५.०४ | ८८.६९ |
| ५. युनायटेड कमर्शिअल बँक | ... | २६.८२ | ३३.३१ | ३६.११ | ४५.२२ | ५५.६४ | ६३.०५ |
| ६. कॅनरा बँक | ... | १०.६७ | १३.२२ | १९.९० | २३.०१ | ३०.०२ | ३६.९८ |
| ७. युनायटेड बँक ऑफ इंडिया | ... | १७.९३ | १८.२९ | २३.०१ | २९.४१ | ३९.२१ | ४८.८८ |
| ८. देना बँक | ... | १६.३१ | १९.२५ | १९.१० | २१.७० | ३०.१२ | * |
| ९. सिंडिकेट बँक | ... | १.३० | १.६६ | २.६५ | ४.३६ | ७.६८ | १२.४० |
| १०. युनियन बँक ऑफ इंडिया | ... | १५.३७ | १९.२६ | २५.७२ | ३६.२४ | ३८.९८ | ४०.९९ |
| ११. अलाहाबाद बँक | ... | १८.५८ | २१.३७ | २३.६० | २६.९५ | ३३.०६ | ३५.९० |
| १२. इंडियन बँक | ... | १४.८२ | १४.५३ | १६.४३ | १६.४३ | १९.९६ | २२.७३ |
| १३. बँक ऑफ महाराष्ट्र | ... | ६.५५ | ८.४३ | ९.२६ | १२.०२ | १५.६३ | १९.०८ |
| १४. इंडियन ओव्हरसीज बँक | ... | ६.७५ | १०.०२ | १२.५५ | १६.०७ | २०.२४ | २४.६९ |
| | ... | ३१३.२९ | ३६१.६३ | ४०५.६५ | ४८८.४३ | ६०४.६३ | ६१६.९८ |

+ जून, १९७२ पर्यंत    * उपलब्ध नाही.

## "रेंट ॲक्ट जेथे लागू आहे, तेथे सहकारी कायदा लागू नाही"

"अर्जदार हा पुष्प भुवन को. सोसायटीच्या कुलाबा येथील इमारतीचा भाडेकरू आहे" असा कोर्टाचा अभिप्राय मागणारा अर्ज मुंबईच्या स्मॉल कॉजेस कोर्टात करण्यात आला. त्या प्रकरणी कोर्टाने सोसायटीवर आर्बिट्रेशनचे काम तहकूब करण्याचा हुकूम काढला.

"मी भाड्याने जागा घेतली परंतु लीव्ह अँड लायसेन्सच्या करारावर सही करण्यास मला भाग पाडण्यात आले. मी भाडेवाढीस नकार दिला तेव्हा मला बाहेर काढण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यानंतर माझ्याविरुद्ध आर्बिट्रेशनची कारवाई करण्यात आली. ह्या प्रकरणी रजिस्ट्रारला किंवा त्याच्या नॉमिनीला अधिकारच नाही; फक्त स्मॉल कॉजेस कोर्टालाच अधिकार आहे" असे अर्जदाराने आपल्या अर्जात म्हटले आहे.

अर्जदाराने कोर्टात २,८०० रु. अनामत ठेवावेत, ह्या अटीवर कोर्टाने तहकुबीचा हुकूम दिला. "रेंट ॲक्ट जेथे लागू आहे त्या बाबतीत सहकारी सोसायट्यांचा कायदा लागू राहणार नाही" ह्या सुप्रीम कोर्टाच्या मतप्रदर्शनाचा जज्जांनी आधार घेतला. ह्या प्रकरणी स्मॉल कॉजेस कोर्टालाच अधिकार आहे, असेही त्यांनी नमूद केले.

---

## परदेशी बँकांनी भारतातून स्वदेशी पाठविलेले नफे

| (१९७१–७२) | रु. |
|---|---|
| अमेरिकन एक्स्प्रेस (अमेरिका) | ३६,५६,५५५ |
| बँक ऑफ अमेरिका (अमेरिका) | ३५,२४,१६५ |
| फर्स्ट नॅशनल सिटी बँक (अमेरिका) | ९०,४७,७८१ |
| ब्रिटिश बँक ऑफ दि मिडल ईस्ट (ब्रिटन) | ५,०७,७६२ |
| दि चार्टर्ड बँक (ब्रिटन) | ४,९०,८४९ |
| मर्कंटाइल बँक (ब्रिटन) | ३९,१५४ |
| नॅशनल अँड ग्रिंडलेज बँक (ब्रिटन) | ९०,८८,४९३ |
| हाँगकाँग अँड शाँघाय बँकिंग कॉर्पोरेशन (हाँगकाँग) | ३,८२,६०८ |
| मर्कंटाइल बँक (हाँगकाँग) | १२,४४,८४४ |
| अलगेमेन बँक लेदरलंड (हॉलंड) | ६,६९,७०८ |
| मिटसुई बँक (जपान) | ३,५१,४६७ |
| बँक ऑफ टोकियो (जपान) | ११,७७,७९४ |

---

## तुरुंगातील कैदी आणि आरोपी

महाराष्ट्रातील ४०% गुन्हेगार दंड देऊ न शकल्यामुळे तुरुंगवास पत्करतात. जामीन देता न आल्यामुळे खटला संपेपर्यंत बहुतेक आरोपींना पोलीस कस्टडीत राहावे लागते. त्यांपैकी ८०% निरपराधी ठरून बाहेर पडतात. महाराष्ट्रातील तुरुंगात एका वेळी साधारणपणे १२,००० कैदी आणि ६,००० आरोपी राहात असतात. २८% कैदी २१ वर्षांखालचे, ४५% कैदी २२ ते ३० वर्षांचे आणि बाकीचे २७%, ३० वर्षांवरचे असतात.

## युनिट ट्रस्टच्या नफ्याच्या दरात वाढ

युनिट ट्रस्ट ऑफ इंडिआने आपल्या नफ्याच्या दरात गेल्या वर्षापेक्षा एक चतुर्थांश टक्क्याने वाढ करून ८·५ टक्के नफा देण्याचे जाहीर केले आहे. १९७३ च्या जुलैअखेर संपलेल्या वर्षात ट्रस्टच्या रोख्यांची विक्री २३·०३ कोटी रु. इतकी झाली. आतापर्यंतच्या वार्षिक विक्रीचा हा उच्चांक आहे. ह्या विक्रीत विमा योजनेशी संबंध असलेल्या रोख्यांच्या विक्रीचा समावेश नाही. १९६९–७० साली २२·६३ कोटी रुपयांच्या रोख्यांची विक्री झाली होती. म्हणजे गेल्या वर्षी झालेली विक्री २० लाखांनी अधिक आहे. युनिट ट्रस्टच्या रोख्यांची विक्री लोकप्रिय करण्यासाठी तीन उपाय योजण्यात आले होते. गुंतवणुकीवरील नफ्यात तर वाढ करण्यात आलीच; पण त्याचबरोबर जुलै महिनाअखेर होणाऱ्या विक्रीसाठी रोख्यांची किंमत कमी करण्यात आली होती. शिवाय ट्रस्टच्या रोख्यांची खरेदी आणि विक्री ह्यांमधील फरक कमी करण्यात आला होता. ह्या उपायांचा चांगला उपयोग झाल्याचे दिसून आले. १९७२–७३ साली ट्रस्टचे एकूण उत्पन्न ११·८२ कोटी रुपये झाले. त्यापूर्वीच्या वर्षी ते ९·६३ कोटी रुपये होते. गेल्या वर्षी झालेल्या उत्पन्नातून १०·८० कोटी रुपये रोखेधारकांना वाटण्यासाठी उपलब्ध करण्यात आले. गेल्या वर्षी ८·७३ कोटी रुपये उत्पन्न वाटपाकडे देण्यात आले होते. ट्रस्टचे अध्यक्ष म्हणतात की ट्रस्टच्या पैशासंबंधीचे गुंतवणुकीचे धोरण बदलण्यात आल्यामुळे उत्पन्नात सुधारणा झाली. १९७३ जूनच्या अखेरीस ट्रस्टने रोख्यात एकूण १५२·४२ कोटी रुपये गुंतविलेले होते. त्यापूर्वीच्या वर्षात ९८·३६ कोटी रुपये गुंतविलेले होते.

---

## रासायनिक खतांचा वापर बेताने करा

शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी सर्व जगात रासायनिक खतांचा वापर मोठ्या प्रमाणावर करण्यात येऊ लागला आहे. वाढती लोकसंख्या आणि शेतीचे अपुरे उत्पादन ह्यांच्या कात्रीत सापडलेल्या अविकसित देशांना तर शेतीचे उत्पादन त्वरित वाढविण्याची फार गरज आहे. तथापि, हे साध्य गाठण्यासाठी रासायनिक खतांचा बेसुमार वापर करण्यात येऊ नये असा इशारा तीन जगप्रसिद्ध शास्त्रज्ञांनी दिला आहे. 'हरित क्रांतीतील पुढचे पाऊल' ह्या रेडिओवरील परिसंवादात त्यांनी आपले विचार व्यक्त केले. रासायनिक खतांचा वापर कमी करण्यासाठी शेतीविषयक संशोधनात विविधता आणली पाहिजे असा अभिप्राय त्यांनी व्यक्त केला. त्याचबरोबर त्यांनी धोक्याचा इशाराही दिला. रासायनिक खताच्या अतिरिक्त वापरामुळे निसर्गाचे दूषितीकरण वाढण्याच्या परिणामाकडे लक्ष वेधून भविष्यकाळात अमाप पीक देणाऱ्या धान्याच्या जातींसाठी पुरेसे रासायनिक खत मिळणे शक्य नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

---

## जादुगार गोगिआ पाशा

आपल्या जादूच्या खेळांनी प्रेक्षकांना थक्क करणारे गोगिआ पाशा आता व्यवसायातून जवळजवळ निवृत्त झाले आहेत. त्यांचे वय आता ६७ आहे. डेहराडून येथील आपल्या छोट्या घरात ते कालक्रमणा करीत असतात. त्यांच्या वडिलांची इच्छा त्यांनी कुशल शस्त्रक्रियाविशारद व्हावे अशी होती. एका ज्योतिषाने त्यांची निमुळती सडसडीत बोटें शल्यकर्माला अत्यंत अनुकूल आहेत असा अभिप्राय त्यांच्या लहानपणीच व्यक्त केला होता. वैद्यकाची पद्‌विका घेऊन ते पुढील शिक्षणासाठी इंग्लंडला गेले. तेथे त्यांची प्रसिद्ध ब्रिटिश जादूगार ओवेन क्लार्क ह्यांच्याशी गाठ पडली व ते त्यांचे शिष्य झाले. १९२८ साली ते आपल्या गुरूबरोबर न्यूयॉर्कला गेले. तेथे एक प्रयोग चालू असताना ओवेन क्लार्क रंगमंचावरच निधन पावले. पण, गोगिआ पाशांनी न डगमगता खेळ पुरा करून दाखविला. तेव्हापासून ते जगभर प्रथम श्रेणीचे जादूगार म्हणून प्रसिद्ध पावले. त्यांचे नाव दलपतराय गोगिआ असून त्यांना पाशा ही पदवी इजिप्तचे माजी राजे फरूक ह्यांनी दिलेली आहे. आपल्या ऐन उमेदीत त्यांनी ८ आंतरराष्ट्रीय पदके मिळविलेली आहेत. १९३७ मध्ये त्यांनी म्युनिकमधील एका होटेलमध्ये हिटलरसमोर बघताबघता हवेतून नाणी काढून दाखविण्याचा प्रयोग करून दाखविला होता. आजही ते ही जादू करून दाखवितात. पण, व्यवहारातील खराखुरा पैसा मिळविण्यासाठी मात्र ते २० खोल्यांचे एक होटेल चालवीत आहेत. ते पत्रकारांशी बोलताना म्हणाले, "बहुतेक सर्व जादूगार आयुष्याच्या अखेरीस दारिद्र्यात मरण पावले आहे. मला मात्र तशी भीती वाटत नाही. कारण मी स्त्रियांच्या नादी लागत नाही आणि बाटलाबाईच्याही अधीन होत नाही."

---

## छोट्या नाण्यांची टंचाई चालू राहण्याचा संभव

टांकसाळीतून छोटी नाणी पाडण्याच्या कामात बरीच प्रगती होऊन आता दररोज ७५ लाख छोटी नाणी पाडण्यात येऊ लागली आहेत. तरीहि आणखी काही काळ ह्या नाण्यांची टंचाई चालू राहण्याची शक्यता आहे. १९७३–७४ सालात २१६.५ कोटी नाणी पाडण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. त्यांची दर्शनी किंमत ३१.४८ कोटी रुपये होईल. पण ह्या वर्षात २२३ कोटी नाण्यांची आवश्यकता लागेल असा अंदाज करण्यात आलेला आहे. छोटी नाणी पाडण्याच्या बाबतींत मोठा पल्ला गाठण्यात आला असला तरी देशाच्या अनेक भागांत १० पैशांच्या व २५ पैशांच्या नाण्यांचा तुटवडा भासत आहे. ह्या नाण्यांची टंचाई भासण्याचे एक कारण असे आहे की वस्तूंच्या किंमतीत झालेल्या भरमसाट वाढीमुळे छोट्या नाण्यांना काही किंमतच राहिलेली नाही. १९७०–७१ मध्ये छोट्या नाण्यांची टंचाई प्रथम जाणवू लागली.

---


"नवभारताच्या उभारणीमध्ये सहकारी चळवळ फार महत्त्वाची भूमिका पार पाडीत आहे."

—पं. जवाहरलाल नेहरू

*महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची प्रेरक शक्ती*

**दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड**

मुख्य कार्यालय : फोर्ट, मुंबई १. मुंबईतील शाखा २१

प्रादेशिक कार्यालय : महाल, नागपूर नागपूरमधील शाखा ५

| | |
|---|---|
| भांडवल व निधी | रु. ११ कोटी |
| ठेवी | रु. १०४ कोटी |
| दिलेली कर्जे | रु. १४९ कोटी |
| खेळते भांडवल | रु. २०५ कोटी |

**सामुदायिक हितासाठी झटणारी आगळी बँक**

**दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह लँड डेव्हलपमेंट बँक लि.**

जे. के. बिल्डिंग, १ रा माळा, नरोत्तम मोरारजी मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.

| | | |
|---|---|---|
| तारेचा पत्ता : "मॉर्गेज" | दूरध्वनी | मुख्य कार्यालय : २६७८० १/२/३ (३ लाईन्स) कार्यकारी संचालक : २६१४९७ (डायरेक्ट लाईन) उपकार्यालय नं.१: २६०३०६ नं.२: २६०००६ |

राज्य सहकारी भूविकास बँक व राज्यातील तिच्या २५ जिल्हा शाखा यांच्यामार्फत तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच ट्रॅक्टर व जमीन-सुधारणेकरिता कर्ज-वाटप करण्यात येते. जून १९७२ अखेर बँकेचे भागभांडवल ९ कोटी ३० लाख, गंगाजळी ८३ लाख, ऋणविमोचन निधीची गुंतवणूक ५७ कोटी व येणे कर्ज १२१.२२ कोटी आहे.

डी. एस. जोशी
अध्यक्ष

रा. गो. गोखले
व्यवस्थापक

जी. पी. भावे
कार्यकारी संचालक

# व्यवस्थापनातील समस्या (११)

## बँकेचा शिपाई आणि साहेबाच्या घरचे काम

( शाम रघुनाथ खाखरे, बँक ऑफ महाराष्ट्र, तासगाव )

अदृश्य जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील श्री उत्कर्ष हे नाठेठोम तालुक्याच्या ठिकाणी बँक इन्स्पेक्टर म्हणून काम करीत होते. शाखा मोठी होती व जास्त सोसायट्या त्यांच्याकडे होत्या, त्यामुळे त्यांना कामही भरपूर होते. स्वतः उत्कर्ष उमेदीचे, उत्साही असल्यामुळे काम मनापासून करीत व हाताखालील लोकांकडून काम कौशल्याने करून घेत. त्यांच्या या गुणामुळे ते तालुक्यात लवकरच लोकप्रिय बनले.

राजा नावाचा शिपाई, रोज सकाळी साहेबांचे घरी जात असे, घरचे पाणी भरणे, अंथरूण काढणे, भाजीपाला, दळण आणणे वगैरे कामे तो करीत असे. साहेबही तसे उदार होते. रोज शिपायाला चहा देणे, वेळप्रसंगी उसने पैसे देणे, अडीअडचणी समजावून घेऊन रजाही देणे, अधेमधे घरी सोडणे यामुळे दोघांचेही बरे चालले होते. हाताखालच्या लोकांत याबद्दल चर्चा चाले; मात्र ती साहेबांच्या माघारी. कधी शिपायालाही घरी काम करण्याबद्दल इतर लोक शालजोडीतून मारीत असत, ते त्यालाही कळे. त्याला असेही वाटे आज आपण काम केले नाही व मग साहेबांनी दुसरा शिपाई त्यांच्याकडे घेतला व आपली बदली केली तर भत्ता, दौराही बुडणार.

थोड्याच दिवसांत राष्ट्रीयीकृत बँकेतील कर्मचारी युनियनच्या मिटिंगला हजर राहण्याचा राजाला प्रसंग आला. मिटिंगमध्ये ऑफिसर लोक कसा त्रास देतात, आपण कसे वागायचे व आपले हक्क काय याची जाणीव देणारी भाषणे झाली. यांचा परिणाम राजाच्या मनावर झाला, त्याला आपल्या हक्कांची जाणीव झाली व त्याने फक्त बँकेतील काम करायचे, साहेबाच्या घरी काम करायचे नाही असे पक्के मनाशी ठरविले.

दुसरे दिवशी सकाळी तो साहेबाच्या घरी गेलाच नाही. राजा आजारी असेल अगर घरी काही अडचणी असतील असे समजून उत्कर्ष व त्यांच्या घरातील लोकांनी आपली कामे आवरून घेतली.

बँक घराजवळच असल्यामुळे घरी आंघोळ, देवपूजा आवरून उत्कर्ष बँकेत आले. दुसरा शिपाई गोपाळ बँकेत होताच आणि त्याने पहिलीच बातमी साहेबांना सांगितली की, "साहेब काल मिटिंग होती, राजा गेला होता आणि तो आता तुमच्या घरचे काम करणार नाही असे म्हणाला." गोपाळ पुढे असेही म्हणाला, "साहेब, मला हे पसंत नाही. मी तुमच्या घरी काम करतो." उत्कर्ष वस्ताद होते. त्यांनी गोपाळला नको म्हणूनच सांगितले.

अकरा वाजता राजा बँकेत आला. साहेब त्याला काहीच बोलले नाही. टपाल वगैरे पाहून झाल्यावर अगदी सहजतेने साहेबांनी विचारले, सकाळी घरी आला नाहीस काही अडचण होती का? तेव्हा राजा म्हणाला नाही थोडे काम होते. स्पष्ट बोलण्याचा धीर त्याला झाला नाही. ते पाहून साहेब त्याला म्हणाले बरे मग आता घरी जा व काही कामे असतील तर करून ये. मग मात्र राजा स्पष्ट म्हणाला "साहेब मी घरची कामे करणार नाही. मला फक्त बँकेतीलच कामे सांगा."

साहेबांनी त्याला सर्व परीने समजावून सांगितले. युनियन, राष्ट्रीयीकृत बँका व सहकारी बँका यांतील फरकही सांगितला. तथापि राजाच्या मनावर त्याचा काहीही परिणाम झाला नाही. मग मात्र साहेबांना बरे वाटले नाही.

दुसरे दिवशी साहेबांनी राजास दौऱ्यावर जायचे म्हणून सांगितले व सकाळी ९ वाजता येण्यास सांगितले. दौरा म्हणजे सोसायटीच्या ठिकाणी कोंबडीचे जेवण, मजेत राहणे, शिवाय बँकेचा भत्ता, मोटारभाडे हे आलेच. हा नेहमीचा अनुभव. मात्र दुसरे दिवशी साहेबांनी मोठी पत्र्याची बॅग बरोबर घेतली. त्यात सर्व जेवणाचे सामान म्हणजे तांदूळ, गव्हाचे पीठ वगैरे घेतले. बॅगेतच पाटा, वरवंटा व उखळ घेतले व बॅगेला कुलूप लावले. तोवर राजा आलाच. साहेब त्याला म्हणाले, राजा आपणाला बँक भत्ता देते. त्यामुळे सोसायटीत कोणाला त्रास द्यायचा नाही. मी माझे जेवण हातांनी करणार आहे. तू पण तुझी व्यवस्था कर. असे सांगून त्याला ती बॅग उचलून स्टँडवर जाण्यास सांगितले. ते जड ओझे घेऊन राजा स्टँडवर आला व साहेबांबरोबर एस. टी. त बसला. सोसायटीचे गाव पाटीपासून १–१॥ मैल आत होते. सोसायटीचे सेक्रेटरी गाडी घेऊन पाटीवर आले होतेच. साहेब व राजा आपल्या "पसाऱ्यासह" खाली उतरले, तेव्हा सेक्रेटरी यांना आश्चर्य वाटले व ते बॅग उचलून गाडीत ठेवू लागले. तेव्हा साहेब म्हणाले, सेक्रेटरीसाहेब बँक आम्हाला भत्ता देते, शिवाय मदतीला शिपाई आहे. मी तुमच्या गाडीत बसणार नाही. आम्ही पायीच येऊ. व राजाला बॅग उचल म्हणून सांगितले. सोसायटीतील लोकांना हे नवीनच होते. मात्र राजाला त्याचा पूर्ण बोध झाला. दीड मैल ओझे घेऊन जाईपर्यंत राजाला घाम फुटला.

साहेब सोसायटीच्या लोकांना म्हणाले, आम्हाला भत्ता मिळतो मग आम्ही तुम्हाला का त्रास द्यायचा? राजा मात्र साहेबांच्या मात्रेने थंड झाला व सायंकाळी बॅग घेऊन परत आला.

श्री. उत्कर्ष साहेबांनी राजावर सूड घेतला का राजाला धडा शिकविला?

राजाने सर्व गोष्टींचा विचार करून साहेबाच्या घरी काम करावे का न करावे? वाचकांनी आपले मत द्यावे.

**भाक्रा धरणात जादा पाणी**— १९७२ साली भाक्रा धरणात पाण्याची साठवण पुरेशी झाली नाही. कारण अवर्षणाचा तडाखा त्या धरणाच्या पाणलोटाच्या क्षेत्रालाही बसला होता. पाण्याचा साठा अपुरा झाल्यामुळे पाण्याची व विजेची जबर टंचाई निर्माण झाली होती. चालू पावसाळ्यात मात्र भरपूर पाऊस पडल्याने पाण्याचा सुकाळ झाला आहे. गेल्या वर्षीची पाण्याची पातळी आताच गाठली गेली आहे. पावसाळ्याचे तीन महिने अजून जावयाचे आहेत.

**मक्याच्या उत्पन्नात क्रांती** — १९६० ला सुरू झालेल्या दशकाच्या मध्यावर गव्हाच्या उत्पादनात क्रांती झाली. मेक्सिकोतून आणलेल्या बेण्यामुळे ह्या क्रांतीचा पाया घातला गेला. आता संकरित मक्याचे बेणे अमेरिकेकडून आणले आहे. पंजाबात नव्या बेण्याची लागवड करण्यात येत आहे.

**मध्यवर्ती सरकारचा नोकरवर्ग**—३१ मार्च, १९७१ रोजी मध्यवर्ती सरकारच्या नोकरीत २९·२ लक्ष नोकर होते; ३१ मार्च, १९७० रोजी त्यांची संख्या २८·५ लक्ष होती. नोकरांपैकी रेल्वेज्मध्ये ५०·९%, संरक्षणखात्यात ( मुलकी ) १७·६%, दळणवळणखात्यात १४·३%, अर्थखात्यात ४·४% होते. नोकरांपैकी ६७,४०० ( २·५% ) स्त्रिया होत्या. १९७० साली स्त्री नोकरांची संख्या ६३,९०० होती. एकूण कायम नोकरांपैकी म्हणजे २७ लक्ष नोकरांपैकी निम्म्यापेक्षा अधिक नोकरांचा पगार अधिक महागाई भत्ता मिळून दरमहा १५० रु. पेक्षा कमी प्राप्ती होती; एक-तृतीयांश नोकरांची प्राप्ती १५० रु. ते २९९ रु. होती. ५०० रु. पेक्षा जास्त प्राप्ती असणारे शंभरात तीन होते.

**कंपनीला नवीन ठेवी स्वीकारण्यास बंदी**— रिझर्व्ह बँकेने के. टी. डोंगरे आणि कं. प्रा. लि. ला पब्लिककडून नव्या ठेवी स्वीकारण्यास बंदी केली आहे. बिगर-बँकिंग, बिगर-फिनॅन्शिअल कंपन्यांच्या ठेवी घेण्यासंबंधीच्या रिझर्व्ह बँकेच्या काही सूचना न पाळल्या गेल्याचा हा परिणाम आहे.

**सहा बँकांचे डायरेक्टर निवृत्त होणार**—राष्ट्रीयीकृत ६ बँकांचे मॅनेजिंग डायरेक्टर येत्या ऑगस्ट–सप्टेंबर मध्ये निवृत्त व्हावयाचे आहेत– श्री. प्रभु ( कॅनरा बँक ), श्री. गुल महंमद ( देना बँक ), श्री. मुकर्जी ( अलाहाबाद बँक ), श्री. चेत्तूर ( इंडियन ओव्हरसीज बँक ), श्री. सक्सेना ( बँक ऑफ इंडिया ) आणि श्री. दत्ता (युनायटेड बँक ऑफ इंडिया). बाहेरील लोकांना ह्या जागी नेमावयाचे की खालच्या लोकांना बढती द्यावयाची, असा प्रश्न अर्थखात्यापुढे आहे.

**करमणूक कराचे उत्पन्न**— १९७२–७३ मध्ये बृहन्मुंबईमधील ११२ सिनेमागृहांपासून ९,५४,९३,२६२ रु. करमणुकीचा कर वसूल झाला. १९७१–७२ मधील १०१ सिनेमागृहांपासून झालेली वसुली ८,५६,७९,८०४ रु. होती.


सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.

मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

♣

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

♣

फोन नं. :– ३८३३७ ] सरदारगृह प्रा. लि. [ तार–सरदारगृह

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.



With over a thousand branches

CENTRAL BANK OF INDIA

extends to you these facitities

- Open today a Saving Account with only Rs. 5/- and earn interest at 4%
- Save for future. Join our Recurring Deposit Scheme. Minimum monthly interest upto 7%
- Centrals Services are available to you through more than one thousand branches

Contact nearer Branch for further information

DEVELOP SAVINGS HABIT THE BEST HABIT

PADMA ADVTS.

## श्रीमंत व गरीब देशांतील आर्थिक अंतर

पंतप्रधान इंदिरा गांधी ह्यांनी कॅनडामधील आपल्या दौऱ्यात ओटावा येथे तेथील उद्योगपतींपुढे भाषण करून श्रीमंत देशांतील नागरिक अविकसित देशांतील नागरिकांपेक्षा २० पट अधिक संपत्तिसाधनाचा उपभोग घेतात असे म्हटले होते. गरीब व श्रीमंत देशातील आर्थिक तफावत फार मोठी आहे ह्याबद्दल आता वाद राहिलेला नाही. परंतु ह्या तफावतीचे मोजमाप करण्याच्या पद्धती आणि ती दूर करण्याचे उपाय ह्यांबद्दल मात्र अर्थशास्त्रज्ञात मतामतांचा गलबला दिसून येतो. तीन वर्षांपूर्वी युगोस्लाव्हिआमध्ये ह्या तफावतीसंबंधी एक परिषद् भरविण्यात आली होती. ह्या परिषदेत भाग घेतलेल्या अर्थशास्त्रज्ञांनी ह्या विषयासंबंधी जे विचार व्यक्त केले त्यांचे आता एका पुस्तकात संकलन करण्यात आले आहे. विषयाचा अनेक अंगांनी विचार त्यात झालेला दिसून येतो. गरीब व श्रीमंत देशांतील आर्थिक विषमतेसंबंधी परिषदेत बोलताना नैरोबीच्या प्रतिनिधींनी मूलभूत प्रश्नाला हात घातलेला दिसून येतो. आर्थिक विषमतेच्या प्रश्नाविषयी बोलताना ते म्हणतात की श्रीमंत देशांकडून गरीब देशांकडे माल, तंत्रविज्ञान, आर्थिक संस्था आणि मनोवृत्ती ह्यांचा ओघ सतत व वाढत्या प्रमाणावर येत आहे. पण हा ओघ गरीब देशांना उपकारक होतो असे म्हणता येणार नाही. प्राथमिक गरज भागविणाऱ्या अन्नधान्याची आयात सोडली तर गरीब देशांत कोणत्या प्रकारचा व कोणत्या दर्जाचा माल पाठवावा ह्याची किल्ली श्रीमंत देशांच्याच हातांत आहे. अशा परिस्थितीत अविकसित देशांत जो माल निर्माण करण्यात येतो, उत्पादनाचे जे तंत्र ते वापरतात, आणि जे शिक्षण तेथे देण्यात येते त्यांचा त्या देशांतील गरजांशी फारसा संबंध राहात नाही, ह्यात नवल नाही.

अविकसित देशांना आपल्या अर्थव्यवस्थेच्या विकासाचा वेग पुरेसा वाढवून नजीकच्या भविष्यकाळात दारिद्र्यावर मात करता येईल असे दिसत नाही. त्यांच्या विकासाचा वेग मंद का असावा असा प्रश्न उपस्थित करून परिषदेत भाग घेणारे दुसरे एक अर्थशास्त्रज्ञ म्हणतात की संमिश्र अर्थव्यवस्थेचा प्रयोग करण्यात येत असल्यामुळे असे होत आहे. ह्या प्रकारच्या अर्थव्यवस्थेत पुष्कळदा भांडवलदारी संस्था-संघटना आणि समाजवादी हेतू ह्यांचे साहचर्य आढळून येते. त्यामुळे त्यांच्यात सुसंवाद राहात नाही. अशा प्रयोगांबद्दल आता वाढती निराशा वाटू लागली आहे. परंतु त्याचे कारण असे सांगता येईल की समाजवादाबद्दलची आस्था आतापर्यंत फक्त बौद्धिक पातळीवरच राहिली आहे. अविकसित देशात देशांतर्गत गरजांचा उपलब्ध साधनांवर वाढता दाब पडत आहे. अशा परिस्थितीत अविकसित देशांतील भांडवलदारीची वाढ व्हावयाची असेल तर पाश्चिमात्य देशांनी त्यांना भरपूर मदत दिली पाहिजे. नाहीतर भांडवलदारी पद्धतीची वाढ होताना उत्पन्नात सहजच होणारी विषमता स्फोटक बनण्याची शक्यता आहे आणि मग अविकसित देश उत्पन्नाच्या वाटणीची विपरीत पद्धत स्वीकारण्यापेक्षा आर्थिक वाढीच्या वेतबाताचा वेग पत्करण्यास उद्युक्त होतील. ह्याच संदर्भात अविकसित देशांतर्गत बुद्धिमंतांचा मोठ्या कंपन्यांकडे जाणारा ओघही महत्त्वाचा ठरतो. हिंदुस्थान–पाकिस्तानसारख्या देशांतून अनेक परदेशी कंपन्या धंदा करीत असतात. त्यांना तेथील कायद्याप्रमाणे तद्देशीयांना व परकीयांना सारखे वेतन द्यावे लागते. पण त्या देशांतील अंतर्गत वेतनश्रेणींचा आणि कंपन्यांकडून देण्यात येणाऱ्या वेतनश्रेणींचा पुष्कळदा कसलाच संबंध राहिलेला नसतो. उच्च शिक्षितांना देण्यात येणारे पगार बडे असल्यामुळे बुद्धिमंतांचा ओघ कंपन्याकडे वाहात असतो. हा ओघ परदेशात जाणाऱ्या ओघापेक्षाही वाईट असतो. कारण त्यामुळे विलासी जीवनाला उत्तेजन मिळत राहते.

---

## पाकिस्तानची शंभर वर्षे १९६५ मध्येच भरली होती

१९६५ मध्ये झालेल्या भारत-पाक युद्धाच्या वार्ता त्या वेळी अनेक परदेशीय वार्ताहर बाहेर धाडीत असत. युद्ध सुरू होऊन सुमारे १५ दिवसांचा अवधी झाल्यावर डी. एन. ए. ह्या जर्मन वृत्तसंस्थेने पाकिस्तानच्या लष्कराचा दारूगोळा संपत आल्याची बातमी दिली होती. त्या बातमीप्रमाणे पाकिस्तानच्या लष्कराजवळ अवघा ८–१० दिवसांचा दारूगोळा शिल्लक राहिला होता. ह्या वृत्ताचा खरेपणा आता खुद्द 'पाकिस्तान इकॉनॉमिस्ट' ह्या साप्ताहिकानेच कबूल केला आहे. आपल्या लेखात साप्ताहिकाने असे म्हटले आहे की १९६५ च्या युद्धात पाकिस्तानच्या तिन्ही दलांनी त्यांच्याजवळील दारूगोळा २२ दिवसांच्या युद्धात जवळजवळ गमावला होता. इतकेच नव्हे तर पाकिस्तानी लष्कराजवळील युद्धाच्या साधनांचीही खूप हानी झाली होती. साधनांपैकी बरीच युद्धात नष्ट झाली होती अगर नाकाम झाली होती किंवा शत्रूच्या हाती पडली होती. १९६५ साली युद्ध सुरू झाल्याबरोबर अमेरिकेची लष्करी मदत थांबली आणि युद्धबंदी होईपर्यंतच्या काळात तिन्ही दलांनी आपला सर्व दारूगोळा उधळून टाकला होता. साप्ताहिक पुढे म्हणते की, तिन्ही लष्करी दलांत लष्करी अंदाजपत्रकातील मंजूर खर्चाचा जास्तीत जास्त वाटा मिळविण्याची स्पर्धा वर्षानुवर्ष चालू होती. १९६५ पर्यंत ह्या स्पर्धेला फारशी धार आलेली नव्हती. कारण, पाकिस्तानचे संरक्षणविषयक धोरण अमेरिकेची पेंटागॉन ही संघटना ठरवीत असे. शिवाय, अमेरिकेकडून मिळणाऱ्या लष्करी साहित्यांच्या प्रमाणातच शिलकी दारूगोळ्याचा पुरवठा करण्यात येत असे. अमेरिकेची मदत थांबल्यानंतर मात्र लष्करी आरमार आणि हवाई दल ह्यांच्यावरील निर्बंध अप्रत्यक्ष रीत्या दूर झाले.

अमेरिकेची लष्करी मदत थांबल्यावर पहिल्याच वर्षी पाकिस्तानला संरक्षक दलाच्या खर्चाचा भार स्वतःच पेलावा लागला. परिणाम असा झाला की शस्त्रसज्ज दलांच्या प्रमुखांनी

आपल्या गरजांचे अंदाज अवास्तव फुगवून सांगण्यास प्रारंभ केला. भारताजवळ असलेल्या युद्धसामग्रीपेक्षाही वरचढ अद्ययावत सामग्री आणि तीही प्रचंड प्रमाणावर मागण्यात येऊ लागली. काही महिन्यांपूर्वी ह्या प्रमुखांच्या डोक्यात हे वारे शिरलेले नव्हते. अर्थातच असे युद्धसाहित्य घाईगर्दीने विकत घेण्यात येऊ लागले. त्यासाठी काळ्या बाजारातील किमती मोजाव्या लागल्या. ज्या देशांनी असे साहित्य विकले त्यांना त्याची गरज नव्हती किंवा ह्या साहित्याचा प्रत्यक्ष रणांगणावर काय उपयोग होतो तो त्यांना अजमावयाचा होता. शिवाय हे साहित्य तिसऱ्या एखाद्या देशामार्फत घ्यावे लागले आणि त्याची किंमत अधिकच फुगली. पाकिस्तानची अर्थव्यवस्था मजबूत असल्याचा पुकारा करण्यात येत असला तरी सरकारी तिजोरीला एवढा भार पेलण्यासारखा नव्हता. पाकिस्तानातील आर्थिक विकासाची सर्व कामे थांबविण्यात आली असती तरीसुद्धा लष्करी साहित्याला लागणारा पैसा पुरा पडणे शक्य नव्हते. संरक्षणदलांच्या प्रमुखांच्या मागण्यांनी पाकिस्तान सरकारला पेचात पाडले. अखेर १९६६-६७ साली अंदाजपत्रकाचे दोन भाग करण्यात आले, व त्यांपैकी संरक्षणखात्याची रक्कम तिन्ही दलप्रमुखांनी आपसात वाटून घेण्यासाठी देण्यात आली. ही पद्धत त्यानंतरही तशीच चालू राहिली आणि दलप्रमुखांची स्पर्धा जोराने चालू राहिली. १९६६ साली संरक्षणखर्चाच्या वाट्याची जी पद्धत स्वीकारण्यात आली तिनेच तिन्ही दलांतील विग्रहाचे बीज रोवले गेले. त्याचा वृक्ष वाढीला लागून पाच वर्षांनंतर पाकिस्तानवर राष्ट्रीय आपत्ती कोसळली.

---

**नटीचे 'केशाकर्षण'**—राकेल वेल्च ह्या आकर्षक नटीने केस रंगविणाऱ्या उत्पादनाच्या जाहिरातीच्या टेलिव्हिजन कार्यक्रमात भाग घेतला. त्यासाठी तिला ८,००,००० रु. मिळाले. तिने घातलेल्या ब्लाऊजची किंमत ३,००० रु. होती. तिच्या अटीप्रमाणे ठरलेल्या फॅशन फोटोग्राफरने टेलिव्हिजन फिल्मचे दिग्दर्शन आणि चित्रीकरण केले. लोकप्रियतेच्या शिखरावर असलेल्या अभिनेत्रींने घातलेल्या अटी अशा पत्करल्या जातात.

**टेलिव्हिजन सेट्सचा विनपरवाना वापर** — गेल्या ऑक्टोबरमध्ये मुंबईत टेलिव्हिजनला प्रारंभ झाला, तेव्हापासून आतापर्यंत ५०,००० सेट्सची विक्री झाली आहे. परंतु, मार्च १९७२ अखेर फक्त १९,२०० सेट्सना लायसेन्स देण्यात आलेले आहे. टेलिव्हिजन सेट्सचा चोरून वापर फार मोठ्या प्रमाणावर होत आहे, कारण त्यासाठी लागणारा अँटीना घरातच बसविता येतो.

**वीजकपातीमुळे नुकसान** — महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिकसिटी बोर्डाचे वीजकपातीमुळे ६ कोटी रु. चे नुकसान झाले. वीजनिर्मितीसाठी कोयनेचे पाणी वापरण्यासाठी बोर्ड महाराष्ट्र सरकारला दरसाल ९.५ कोटी रु. देते. वीजकपातीच्या काळात कोयना धरणाच्या पाण्याची पातळी नेहमीच्या पातळीच्या दोन तृतीयांशाइतकी होती, तेव्हा तेवढी तरी सूट मिळावी अशी बोर्डाने सरकारकडे मागणी केली आहे.

## महाराष्ट्र बँकेचे निवृत्त होणारे ज्येष्ठ अधिकारी

### निरोपसमारंभ

"बँकेच्या अधिकाऱ्याची नोकरी म्हणजे सुळावरची पोळी असते. त्या दृष्टीने महाराष्ट्र बँकेची प्रदीर्घ काल सेवा करून धवल यशाने निवृत्त होण्याची घटना जॉइंट जनरल मॅनेजर श्री. एस्. व्ही. धर्माधिकारी व श्री. पी. व्ही. आगाशे यांचे बाबतीत घडली असल्यामुळे त्यांचा निरोप गौरव समारंभ स्पृहणीय होतो. रिझर्व्ह बँकेने नेमलेले ऑफिसर ऑन स्पेशल ड्युटी श्री. एस्. टी. कर्णिक हेही आता निवृत्त होत आहेत. या तिघांची कामगिरी आदर्श अशीच झाली असून बँकेतील अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना त्यांच्या कारकीर्दीतून पुष्कळच घेण्यासारखे आहे" असे उद्गार महाराष्ट्र बँकेच्या मध्यवर्ती कचेरीतील व बाजीराव रोड शाखेतील बँकेच्या सेवक वर्गातर्फे वरील तिघांना निरोप देण्याच्या प्रसंगी समारंभाचे अध्यक्ष बँकेचे चेअरमन श्री. अप्पासाहेब जोग यांनी काढले.

डॉ. एम्. व्ही. पटवर्धन यांनी प्रास्तविक भाषणात बँकेच्या इमारतीखाली पाण्याचे जिवंत झरे निघाले होते, त्या धर्तीवर बँकेच्या प्रगतीसाठी सन्मानित होत असलेल्या अधिकाऱ्यांनी जीवन दिले ही गौरवास्पद परंपरा होय, असे सांगितले. यानंतर या तीनही अधिकाऱ्यांना श्रीगजाननाची रजतमूर्ती, चांदीचे कलशपात्र व महावस्त्र भेट देऊन सत्कार करण्यात आला.

सत्कारास उत्तर देताना श्री. धर्माधिकारी म्हणाले, "संस्थेच्या हिताकडे आपण पहिले लक्ष दिले तर वैयक्तिक प्रगती होते. पूज्य साने गुरुजींच्या शालेय जीवनातील उद्देशांनी माझे मन प्रभावित झाले व तीच शिदोरी मला जन्मभर पुरली." श्री. आगाशे म्हणाले, "कै. प्रा. वा. गो. काळे प्रभृती अर्थशास्त्रज्ञाच्या सल्ल्यानुसार मी बँकेत सामील झालो आणि तिची सातत्याने व निरलसपणे सेवा केली. यामुळे मी समाधानी आहे."

श्री. एस्. टी. कर्णिक यांनी सांगितले की आपल्यावर रिझर्व्ह बँकेने सोपविलेली कामगिरी थोडीशी अवघड असूनही ती सर्वांच्या सहकार्याने चांगल्या रीतीने पार पाडता आली याबद्दल त्यांनी बँकेच्या अधिकाऱ्यांना धन्यवाद दिले. शेवटी जॉइंट जनरल मॅनेजर श्री. पाडगावकर यांनी सर्वांचे आभार मानल्यावर हा हृद्य समारंभ संपला.

---

**गिरण्या सातही दिवस चालणार**—मुंबईची मिल ओनर्स असोसिएशन आणि राष्ट्रीय मिल्स मजदूर संघ ह्यामध्ये झालेल्या कराराप्रमाणे मुंबईतील कापड गिरण्या सातही दिवस चालू राहतील. त्यामुळे उत्पादनात १६% वाढ होईल. सध्या ह्या गिरण्यात २,२५,००० कामगारांना रोजगार मिळतो. सर्व गिरण्यांनी सात दिवस काम करण्याचे ठरविले तर २०,००० ते २५,००० आणखी कामगारांना काम मिळेल. संबंधित गिरण्यांतील विद्यमान कामगारांच्या नातेवाइकांना प्राधान्य दिले जाईल.

स्थापना १९११

माकडछाप



म्हणजेच

काळी टूथपावडर

नोगी आणि कंपनी प्रा. ली.
मुंबई ६९ ओ. अस.

सोल सेलींग ओजन्टस्

नोगी सेल्स् कॉर्पोरेशन

१७७ जगन्नाथ शंकरशेठ रोड, मुंबई ४. बी आर.

MARATHI





बँकेच्या 'धनवर्धिनी' ठेव योजनेतील एक योजना

निवृत्ती वेतन (पेन्शन) योजना

डॉक्टर, व्यापारी, दुकानदार, कारागीर, फोटोग्राफर
असे आपण कोणतेही व्यवसायीक असा
निवृत्ती वेतनाची आपली सोय ही बँक करते.

दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.


स्थापना १९३६ | मुख्य कार्यालय चिरमुले निकेतन, राजपथ सातारा. | शेडयुल्ड बँक

महाराष्ट्रात सर्वत्र शाखा



★ कार्यक्षमतेचा शिक्कामोर्तब ★


विजय पंपस् कार्यक्षमतेत नेहमीच आघाडीवर—
आता—भारतीय मानक संस्थेकडून विजय पंपास I. S. I. मार्क ★ दर्जेदार पंप निर्मितीची हमी.



इंजिन असो अगर इले. मोटार असो,

त्यांस "विजय" पंपाची

आवश्यकता आहेच.



कारखानदार—

न्यू विजय इंडस्ट्रीज लि.

फोन : २३१
तार : Vijayplow

विश्रामबाग—सांगली ( महाराष्ट्र )

SCO-1 HIN

# नहीं—
# यह कोई
# साधारण कार्य नहीं!

# सरदार
## सोडा वाटर
## यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और खाद्यालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोडे ही काल में कई गुना मुबदला मिल जाता है।

हमारे दूसरे निर्माण हैं: १. रंगहीन द्रव कार्बन डायऑक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है, २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**



कमर्शल सोडा वाटर यंत्र

घरेलू सोडा वाटर यंत्र

## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

सर विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.

फोन: कार्यालय: २५३३७१ कारखाना: ३७८१०२

हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं.९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४११००४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)